# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

नोंदणीकृत कार्यालय, महाबीज भवन, कृषिनगर, अकोला.

## निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. अकोला यांचे पैलपाडा येथे २० एकर प्रक्षेत्रावर उन्हाळी २०२४ हंगामात क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी घेणेस्तव संपूर्ण शेत व्यवस्थापनाचा कंत्राट देणे करिता इच्छुक व सक्षम कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अर्ज महाबीज गुणवत्ता नियंत्रण विभाग, मुख्यालय अकोला, येथून कार्यालयीन वेळेत प्रति निविदा अर्ज फी रु.१५०/- भरून प्राप्त करून घेता येईल. निविदा अर्जासोबत अनामत रक्कम रु.५०००/-चा भरणा महामंडळाच्या खात्यात करणे आवश्यक आहे. इच्छुक निविदा धारकांनी निविदा अर्ज भरून दि.२८/१२/२०२३ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत गुणवत्ता नियंत्रण विभाग, मुख्यालय अकोला येथे सादर करावेत. प्राप्त निविदा शक्यतो त्याच दिवशी उपस्थित निविदाधारकासमोर उघडण्यात येतील.मागविण्यात आलेल्या निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार महाबीज व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

डॉ.प्रफुल्ल लहाने
महाव्यस्थापक (गु.नि.व संशोधन)
महाबीज, अकोला.

(परिशिष्ट क. १)

**महाबीज प्रक्षेत्र पैलपाडा क्षेत्रचाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी शेतव्यवस्थापन करीता निविदा अर्ज विवरण**

प्रती, दिनांक...../...../२०२३.
महाव्यवस्थापक (गु.नि. व संशोधन),
म.रा.बि.म.मर्यादित,
अकोला

**विषय : क्षेत्रचाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता शेतव्यवस्थापन कंत्राट देणे बाबत.**

महोदय,

दै.देशोन्नती या वृत्तपत्रात दिनांक ...../...../२०२३ रोजी प्रकाशित झालेल्या निविदा सुचनेनुसार खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

1. निविदा धारकाचे पुर्ण नांव ..........................................................................................
2. संपुर्ण पत्ता ..........................................................................................
3. दुरध्वनी /भ्रमनध्वनी कमांक ..........................................................................................
4. अनामत रक्कम................डी.डी.क./UTR क्र.................... पावती क................दि......................
   बॅकेचे नांव/ठिकाण..........................................................................................

उपरोक्त माहिती सत्य आहे असे मी/आम्ही जाहीर करतो, मला/आम्हास कामाचे सर्व नियम व अटी मान्य असून कामाचे दर सोबत दिलेल्या परिशिष्ट क. २ मध्ये नमूद केलेले आहेत. तसेच क्षेत्र चाचणी व क्षेत्र उगवण चाचणी अंतर्गत करावयाची कामे परिशिष्ट क. 3 वर नमुद केलेले आहे. परिशीष्ठ क. ४ वरील क्षेत्र चाचणी व क्षेत्र उगवण चाचणी करीता निविदा विषयक नियम व अटी मी वाचल्या असुन त्या सर्व मला मान्य आहेत व त्या अनुषंगाने नमुद केलेली सर्व कामे मी करण्यास तयार आहे.

आपला विश्वासू

सही :..................................................

निविदाधारकाचे नाव : ..................................................

(मोहोरसह)

पुर्ण पत्ता : ..................................................

मोबाईल नं. : ..................................................

दिनांक :..........................

ठिकाण :..........................

परिशीष्ट क्र. २

<u>महाबीज प्रक्षेत्र पैलपाडा</u>

दि.

प्रती,
मा. महाव्यवस्थापक (गु.नि. व संशोधन ),
म.रा.बि.म.मर्यादित,
अकोला

**विषय : क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता शेतव्यवस्थापन कंत्राट देणे बाबत.**

महोदय,

दै.देशोन्नती या वृत्तपत्रात दि. ...../...../२०२३ रोजी प्रकाशित झालेल्या निविदा सुचने नुसार खालील प्रमाणे दर सादर करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे विवरण | अंदाजे एकूण क्षेत्र (एकर) | कंत्राटदाराने भरावयाची रक्कम प्रती एकरी रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| | **क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता शेत व्यवस्थापन अंतर्गत मजूराचा कंत्राट** | | | निविदा धारकाने क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणीचे अपेक्षीत नमुना संख्या व संभाव्य क्षेत्र व त्या अंतर्गत घ्यावयाची पीके या सर्व बाबीचा विचार करुन दोन्ही करीता वेगवेगळे दर टाकुन दोन्ही दराची एकुन रक्कम नमुद करावी. |
| १ | क्षेत्र चाचणी करीता संभाव्य क्षेत्र या मधील पिकांचा समावेश खालीलप्रमाणे उडीद/सोयाबीन/मका/बाजरा/ज्वार/ कपाशी/सुर्यफुल/भाजीपाला ई. | ०८ | | |
| २ | क्षेत्रीय उगवण चाचणी करीता संभाव्य क्षेत्र या मधील पिक – सोयाबीन | १२ | | |
| | **एकुन** | २० | | |

टिप : निविदा धारकाने क्षेत्र चाचणी साठी उडीद, सोयाबीन, मका, बाजरा, ज्वार, कपासी, सुर्यफुल, व भाजीपाला या पिका करीता अंदाजे एकुण ०८ एकर क्षेत्रासाठी तसेच क्षेत्रीय उगवण चाचणी साठी सोयाबीन पिका करीता अंदाजे १२ एकर क्षेत्रासाठी या प्रमाणे वेगवेळया चाचणी करीता वेगवेगळे दर टाकण्यात यावे. एकुन २०एकर क्षेत्राचे एकुन दर गृहीत धरुन त्या एकुन दराची सरासरी काढण्यात येईल आलेल्या सरासरी प्रमाणेच प्रति एकर दर काढण्यात येतील. सरारसरी दरामधुनच प्रति एकर कमी दर आलले आहेत त्यावर L-1 निविदा धारक ठरविल्या जाईल. वेगवेगळया चाचणी निहाय L-1 दर विचारात घेतल्या जाणार नाहित. तसेच उपरोक्त नमूद केलेल्या पिक बियाणेचे पात्र होण्याचे प्रमाण यावर नमुन्यांची संख्या तसेच संभाव्य क्षेत्र कमी अथवा जास्त होउ शकते. करार केल्या पासुन सदरील, दर हे कमीत कमी पूढील १२ महिन्यासाठी लागु राहतील.

सही :.......................................................

दिनांक :...............................

निविदाधारकाचे नाव : ......................................

ठिकाण : ..........................

पुर्ण पत्ता: ..................................................

मोबाईल नं.: ...................................................

( परिशीष्ट क्र.३)

# महाबीज प्रक्षेत्र पैलपाडा

**क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता शेतव्यवस्थापन कंत्राट देणे बाबत**
**क्षेत्र चाचणी करीता ०८ एकर व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता अपेक्षीत क्षेत्र १२ एकर**
(निविदा धारकाने नमुद करावयाची माहीती)

अ) निविदा धारकाचे पुर्ण नांव,पुर्ण पत्ता : ..........................................
व फोन नंबर ..........................................

ब) शेत व्यवस्थापनात लागवडीखाली येणारी पिके : उडीद,सोयाबीन,कपाशी, बाजरा, सुर्यफुल,ज्वार,मका व भाजीपाला ईत्यादी.

क) कामाचे स्वरुप : उपरोक्त नमूद केलेल्या पिकाची क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी घेणे करीता करावयाची ठळक शेतीचे कामे खालीलप्रमाणे.

१) काडीकचरा वेचुन जमीन पेरणीयोग्य तयार करणे.
२) जमीन पेरणी पूर्वी ओलीत करणे.
३) प्लॉट निहाय बियाणे क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता टोकण पध्दतीने पेरणे.
४) आवश्यकते प्रमाणे खत देणे
५) पिकाच्या गरजे नुसार निंदन करणे.
६) आवश्यकते नुसार कोळपणी / डवरणी करणे व पिकास भर देणे.
७) गरजे नुसार उपलब्ध असलेल्या पाण्याच्या स्त्रोता पासुन पिकास पाणी देणे. स्प्रिंकलरसेट द्वारे/ड्रिप द्वारे किंवा पट्टा पध्दतीने पाणी देणे, स्प्रिंकलरचा टप्पा बदलणे.
८) आवश्यकते नुसार किटक नाशकाची तसेच संजीवकांची फवारणी करणे. (पावर पंप अथवा नॅपसॅक पंपाद्वारे )
९) पिक उगवणी पासुन ते कापणी पर्यंत पिकाचे वन्यप्राणी, पशु पक्षी, ईतर प्राणी तसेच चोरा पासुन पिकाचे रक्षण करणे.आवश्यक्तेनुसार सुरक्षा रक्षक बंधनकारक आहे.
१०) पिकातील भेसळयुक्त झाडास धागे अथवा सुचने नुसार टॅग बांधणे.
११) पिकातील झाडाची संख्या मोजणे.
१२) भाजीपाला पिकासाठी आवश्यकते नुसार मंडप अथवा तार/बांबु बांधणे.
१३) क्षेत्र चाचणी अंतर्गत पिकाची कापणी, मळणी, बियाणे वाळवून, पोत्यात भरुन गोडाउन मध्ये साठवणुक करणे.
१४) संपूर्ण कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
१५) आवश्यकते नुसार पुरुष तसेच स्त्री मजूर पूरविणे.
१६) प्रक्षेत्र अधिकारी (क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी),यांनी दिलेल्या सुचनेचे वेळोवेळी पालन करणे.

ड) शेतीच्या मशागती करीता आवश्यक्तेनुसार विविध अवजार तसेच बैलजोडी स्वत:ची अथवा भाडेतत्वावर पूरविण्यात येतील.

फ) नियमीत कामासाठी मजूरांची संख्या : पुरुष .................. साक्षर ..................
महिला .................. साक्षर ..................

निविदा धारकाचे नाव व सही : ..........................................

(परिशिष्ट क्र.४)

## महाबीज प्रक्षेत्र पैलपाडा

### क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता निविदा विषयक नियम व अटी :

१) स्वतंत्र लिफाफ्यामध्ये निविदा अर्ज विवरण सिलबंद करुन त्यावर "**क्षेत्रचाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी करीता शेतव्यवस्थापन कंत्राट देणे बाबत**" हा मजकूर स्वच्छ अक्षरात लिहावा.

२) निविदा विषयक पुरक माहीती तसेच सोबत अनामत रक्कम DD,RTGS/ NEFT,Net Banking द्वारे रु.५०००/—(रु.पाच हजार), (ईएमडी) भरणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्ट (DD) द्यावयाचा असल्यास महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या.अकोला यांचे नांवाने राष्ट्रीयकृत बॅकेंचा अकोला येथे देय असलेला डि.डि. निविदा अर्जासोबत संलग्न करावा. अस्विकृत निविदा धारकांची अनामत रक्कम लेखी विनंती नुसार परत केली जाईल. ज्या निविदा धारकास सदरची निविदा अनामत रक्कम RTGS / NEFT,Net Banking दवारे भरणा करावयाचे असल्यास महामंडळाच्या बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा उमरी अकोला, येथील बॅक खाते क्र.20085400921 व IFSC MAHB0000622 मध्ये ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात यावी.

३) स्वाक्षांकित आधार व पॅन कार्डची झेरॉक्स.

४) स्विकृत निविदा धारकाने विहीत मुदतीत कामाचे आदेश न स्विकारल्यास सदर निविदा धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यापुढील L-2 निविदा धारकास कामाचे आवंटन करण्यात येईल.

५) निविदा धारकाकडून प्राप्त मोहोरबंद निविदा दिनांक २८/१२/२०२३ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत गुणवत्ता नियंत्रण विभाग, मुख्यालय अकोला येथे स्विकारल्या जातील.

६) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदाअर्ज दिनांक २८/१२/२०२३ रोजी दुपारी १६.१५ वा. महाबीज मुख्यालय गुणवत्ता नियंत्रण विभाग, येथे उपस्थित निविदा धारकांसमोर उघडण्यात येतील किंवा त्याप्रमाणे सुचना देण्यात येतील.

७) नियमानुसार वेळेत सादर न केलेल्या, अपुर्ण व खाडाखोड असलेल्या निविदा रद्द समजण्यात येतील.

८) निविदा स्विकृतीची सुचना फक्त स्विकृत निविदा धारकाला लेखी स्वरुपात अथवा मोबाईल द्वारे/ SMS द्वारे कळविण्यात येईल.

९) शेतव्यवस्थापन कंत्राट पध्दती बाबतचा दर दोन्ही चाचणी करीता करार केल्याच्या तारखे पासुन पूढे कमीतकमी १२ महिन्या साठी लागु राहील.

१०) करारनामा कालावधी मधील तसेच कालावधी संपल्या नंतर सुध्दा शेतात उभ्या असलेल्या पिकातील उत्पन्नावर फक्त महामंडळाचा अधिकार राहील.

११) महामंडळातिल अधिका-यांच्या सुचने प्रमाणे शेत जमिनीचे सर्व कामे,लागवड,पेरणी, आंतरमशागत,डवरणी,निंदण,खते,किटकनाशके फवारणी,पाणी देणे,कापणी व मळणी, पिकाची राखण ई. शेतीची कामे करुन देणे कंत्राटदारास अनिवार्य राहील.

१२) कंत्राट दाराचे काम समाधान कारक असल्यास हा करार उन्हाळी २०२४ व २०२५ ह्या दोन वर्षा करिता लागू करण्यासाठी व्यवस्थापनाची मंजुरात स्वतंत्रपणे घेतल्या जाईल.

१३) शेत जमिनी करीता आवश्यक असणारे बियाणे, खते, वरखते आणि किटकनाशके महामंडळाद्वारे पुरविण्यात येतील.

१४) शेतव्यवस्थापन कंत्राटधारकाने वेळोवेळी व आवश्यकतेनुसार महामंडळाच्या अधिका-यांच्या सुचनेचे पालन करुन मागणी प्रमाणे मजूराचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१५) जमिनीची मशागत, पेरणी, कापणी, मळणी ई. सर्व शेतातील कामे महामंडळाच्या अधिका-यांचे नियंत्रणाखाली करावी लागतील.

१६) कुठलेही कारण न दर्शविता कोणत्याही अथवा सर्व निविदा पुर्ण अथवा अंशत: स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार महामंडळाने राखून ठेवले आहेत.

१७) कायदेशीर बाबीचा निपटारा फक्त अकोला न्यायालयाच्या क्षेत्रा अंतर्गतच केला जाईल.

१८) क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणीचे कामे सुरु होताच मजूर,अवजारे ई.पुरवठा करुन शेतीची कामे वेळेवर करणे निविदा धारकाला बंधनकारक राहील.

१९) क्षेत्र चाचणीच्या कामाचे शोधन करारानुसार दर प्रति एकर दराने खालील तिन टप्पा मध्ये देय राहिल.

| | |
|---|---|
| अ) पेरणी झाले नंतर | ५० टक्के शोधन |
| ब) पिकाची निरीक्षणे झाल्यानंतर | ४० टक्के शोधन |
| क) पिकाची काढणी, मळणी झाल्यानंतर | १० टक्के शोधन |

२०) पिकाची काढणी, मळणी करावयाची नसल्यास उर्वरीत १० टक्के शोधन देण्यात येईल.

२१) क्षेत्रीय उगवण चाचणीच्या कामाचे शोधन करारानुसार प्रति एकर दराने खालील दोन टप्यामध्ये देय राहील

अ) पेरणी झाले नंतर — ५० टक्के शोधन

ब) पिकाची निरीक्षणे झाल्यानंतर — ५० टक्के शोधन

२२) बिज परिक्षण प्रयोगशाळेत क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी साठी प्राप्त होणा—या नमुन्यांची संख्या यावर क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी साठी लागणारे क्षेत्र अवलंबुन आहे. त्यामुळे लागणा—या एकुन क्षेत्रात वाढ होउ शकते अथवा कमी होउ शकते. प्रत्यक्ष शोधन हे पेरणी केलेल्या क्षेत्रा नुसारच होईल.

२३) करारनामा कालावधीत कामे करीत असतांना कामे वेळेवर न केल्यामुळे होणाऱ्या नुकसानास कंत्राटदार जबाबदार राहील. तसेच कंत्राटदाराने कामे वेळेवर न केल्याने पिकाचे नुकसा होत असल्यास ती कामे गरजेनुसार महामंडळाद्वारे इतर बाहय स्त्रोताचा वापर करून कामे पुर्ण करण्यात येवून मजूरांना देय असलेले शोधन महामंडळाच्या स्तरावर करण्यात येईल व सदरील शोधन कंत्राटदाराच्या शोधनामधून कपात करण्यात येईल. याकरिता महाबीज व्यवस्थापनाने घेतलेला निर्णय अंतिम राहिल.

२४) कंत्राट दारास संपुर्ण कामकाजावर देखरेख करणे बंधनकारक राहील.

२५) कंत्राटदाराने मजूरांना शासकीय नियमानुसार शोधनकरणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे कायदयानुसार आवश्यक असणारे मजूरांचे शोधनाबाबतचे व इतर आवश्यक असणारे सर्व रेकार्ड ठेवणे बंधनकारक राहील व महामंडळाचे अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास सादर करावे लागतील.

२६) प्रक्षेत्रावर काम करीत असतांना मजूराना काही इजा/अपघात झाल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२७) प्रक्षेत्रावरील मजूरांच्या कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस कंत्राटदार जबाबदार राहील. तक्रारीचा निपटारा त्वरीत करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसे न झाल्यास याबाबत महामंडळाने घेतलेला निर्णय कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२८) ज्या निविदाधारकास निविदा मंजूर झाल्यास त्याला महामंडळासोबत करारनामा करावा लागेल.हा करार झालेल्या तारखे पासुन पूढील १२ महिन्या साठी लागू राहिल.

२९) कंत्राटदाराने महामंडळाचे प्रक्षेत्रावर कामकाजाकरीता स्वत:ची अवजारे/वस्तू वापरावी. व ती अवजारे स्वजबाबदारीवर प्रक्षेत्रावर ठेउ शकतील, परंतु या अवजारे/वस्तूची चोरी/नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३०) क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी शेत व्यवस्थापन कामाचे आवंटन झाल्यानंतर सबंधीत कंत्राटदारास रु.५००/— रकमेच्या एकाच बंध पत्रावर करार निवीदा अर्जा मधे दिले अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचा करार करुन दयावा लागेल.

३१) क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी अंतर्गत असणा—या पिकाची वन्य पशुपक्षी प्राणी, चोर, जनावरे ई.पासुन पिक कापणी पर्यंत संरक्षणाची जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहिल. याकरिता आवश्यक्ते नुसार स्वतंत्र सुरक्षा रक्षक पुरविणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

३२) कंत्राटदार कंत्राट कालावधी पूर्वी कामे मध्येच सोडून गेल्यास योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

३३) नियमा प्रमाणे देय असणा—या रक्कमे मधून टि.डी.एस.कपात करण्यात येईल.

३४) कंत्राट दारास प्रक्षेत्राच्या परिसराची सुध्दा देखभाल ठेवून परिसर स्वच्छ ठेवावा लागेल.

३५) क्षेत्र चाचणी व क्षेत्रीय उगवण चाचणी अंतर्गत करावयाची शेतीचे कामे १४ जानेवारी २०२४ पासुन सुरू करण्याचे नियोजन करावे लागेल.

३६) निविदा प्रक्रियेत सहभाग नोंदविणे पुर्वी काही शंका/अडचण असल्यास प्रत्यक्ष अथवा दुरध्वणीवर बिज परिक्षण अधिकारी बिज परिक्षण प्रयोगशाळा, महाबीज, अकोला यांच्याशी संपर्क (मो.क्र.७५८८६०९००६) करून शंकेचे निरसन करण्यात यावे.

सही :..............................

दिनांक:..............................

ठिकाण :..............................

निविदाधारकाचे नाव :..............................

पुर्ण पत्ता :..............................

मोबाईल नं.:..............................